# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ३०/०६/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

१) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील सिहोरा रेती घाट येथे दिनांक २८/०६/२०२२ चे १६.०० वा.ते दिनांक २९/०६/२०२२ चे ११.०० वा. दरम्यान दिनांक २८/०६/२०२२ रोजी दुपारी १२.०० वा. तहसीलदार पारशिवनी व त्यांचा स्टाप हे पोस्टे कन्हान हद्दीत सिहोरा रेती घाट परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना एक एम.एच.–४०/इडी–५९१० क्रमांकाचा ट्रकमध्ये अवैधरित्या रेती मिळुन आली. सदर ट्रक कार्यवाही करुन पोस्टेला देखरेख करण्याकरीता उभा ठेवला व फिर्यादी हे स्टाप सह सिहोरा घाट येथे गेले असता सदर ठिकाणी आरोपी नामे– रितेश धनराज पांडे, रा. पटेल नगर कन्हान याने साठवुन सरकारी जागेवर ठेवलेली १६० ब्रास रेती मिळुन आला. फिर्यादींनी काल ज्या ठीकाणी आरोपी याने १६० ब्रास साठवुन ठेवली होती त्या ठीकाणी जावुन पाहिले असता आरोपी याने अंदाजे १२५ ब्रास १ ब्रास २,०००/–रु. प्रमाणे २,५०,०००/–रु. ची रेती चोरुन नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जगदीश गोंवीदराव मेश्राम, वय ५७ वर्ष, रा. बजाज नगर, मानेवाडा नागपुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सतिश मेश्राम हे करीत आहे.

२) पो.स्टे. खापरखेडा :– पोउपनि किशोर धोपाडे पो.स्टे खापरखेडा यांचे सोबत स्टाफ हे दिनांक २८/०६/२२ ते २९/०६/२२ चे २१.०० वा. ते ०९.०० वा. पर्यंत नाईट अधिकारी म्हणुन पो.स्टे. खापरखेडा ला हजर असतांना डायल ११२ वर दिनांक २८/०६/२२ चे २३.३० वा. सुमारास एका अज्ञात व्यक्तीने फोन केला की, बीना संगम घाट कन्हान नदीचा घाटात काही लोक आपली गाडी नेवुन रेती चोरून नेत आहेत. अशा माहीती वरून पोस्टे खापरखेडा स्टाफ बीनासंगम नदीच्या पात्रात गेले असता त्यांना दोन पिकअप गाडी उभ्या दिसल्या. त्यांचा जवळ जावुन पाहीले असता १) एमएच– ४९/डी– २५२७ क्रमांकाची बोलेरो पीकअप गाडी मध्ये ८० फुट रेती कि. ३,०००/–रू. भरलेली दिसली व २) एमएच– ४०/बीएल– ९९३२ क्रमांकाची बोलेरो पीकअप गाडीमध्ये रेती भरत असतांना तेथील काम करणारे सर्व लोक तेथुन पळुन गेले. त्यागाडी मध्ये २ ते ३ घमेले रेती मिळुन आली. एकुण गाडी सह ६,०३,०००/–रू. चा मुद्देमाल मिळुन आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार सुर्यभान जळते पो स्टे खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११, ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक दिपक रेवतकर मो.नं. ९५४५५२३७३६ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा सातगाव फाटा नॅश्नल हायवे येथे दिनांक २९/०६/२२ चे १७.३० वा. सुमारास फिर्यादि नामे— अनिकेत प्रदिप बडोले, वय २० वर्ष, रा. श्री साईनाथ कान्वेन्ट, गणेश नगर, नागपुर हा त्याचे एमएच—४०/बीपी—७४७७ क्रमांकाच्या ॲक्टीव्हा गाडीने अश्विनी उर्फ पुजा वय २६ वर्ष व मुलगी ६ वर्ष असे मिळुन बुटीबोरी वरून नागपुर येथे सायंकाळी १७.३० वा. दरम्यान सातगाव फाटा बुटीबोरी येथुन जात असतांना मागुन येणारा केए— १६/सी— ३२२४ क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मागुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक व ईतर व्यक्ती वाहनावरून खाली पडुन मागचे चाक अश्विनी उर्फ पुजा हिचे पोटावरून गेल्याने ति जागीच मरन पावली व दिपक वय २० वर्ष याचे उजव्या हाताला व टोंघळयाला खरचटलेला मार लागला व मुलगी सोनी वय ६ वर्ष हिचे पायाचे पज्याला जबर मार लागलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार खंडारे मो.क्र. ९९२३१५९१५३ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १.५ कि.मी. अंतरावरील नाकाडे हॉस्पीटल मेन रोड काटोल येथे दिनांक २९/०६/२०२२ चे १६.०० वा. ते १६.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— सदाशिव लक्ष्मणराव सावरकर वय ७० वर्ष रा. होळी मैदान शनी चौक समोर काटोल हे त्यांची नात कु.दृष्टी वय ६ वर्ष हीचेसाठी शाळेचे रजिस्टर घेणेसाठी दुपारी ०४.०० वा.दरम्यान घरुन पायदळ रोडच्या काठाकाठाने मार्केटकडे जाण्यासाठी निघाले नाकाडे हॉस्पीटल मेन रोड काटोल येथे पोहचले असता एका काळया रंगाचे मोटरसायकल चालक २ अज्ञात आरोपी वय अंदाजे ५० ते ५५ वयोगटातील हे फिर्यादी समोर आले व 'आम्ही पोलीस आहे व गांजा पकडण्यासाठी आहे, तुमच्या जवळ गांजा आहे का?' असे म्हणुन फिर्यादी यांचे खिश्यांची पाहणी करुन फिर्यादीचे उजव्या हाताच्या मधातली बोटातील १२ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी किंमत ३६,०००/—रु. काढण्यास सांगीतली व त्यांनी स्वताकडे ठेवली व त्यांचे मोटरसायकलवर बसले व गळपुरा चौक काटोल कडे निघुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम १७०, ४१९, ४२० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास संतोष निंभोरकर मो.नं. ९५२७३४७४४३ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

**१) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत इंदीरा नगर कन्हान येथे **दिलीप चिंतामण कुर्वे(मृतक), वय ५२ वर्ष, रा. इंदीरा नगर कन्हान** व त्यांची पत्नी व मुले दि २८/६/२०२२ चे रात्री ११.०० वा. दरम्यान त्यांच्या घरी जेवण करुन झोपले असता दिनांक २९/०६/२०२२ चे ०५.३० वा. सुमारास मृतकचा घरी काही तरी पडण्याचा आवाज आल्याने फिर्यादी व मृतकाची पत्नी व मुलगी उठले व त्यांनी मृतकास जोरजोरात श्वास घेत असल्याचे दिसल्याने फिर्यादी व मृतकाचा पत्नी व मुलींनी मृतकास विचारले की, 'तुम्हाला काय झाले' तेव्हा मृतकाने सांगीतले की, त्यांनी विषारी औषध खाल्यामुळे त्यांना त्रास होत आहे असे फिर्यादीला कळताच फिर्यादी व मृतकाचा घरच्या लोकांनी मृतकास कन्हान येथील वानखेडे हॉस्पीटल मध्ये उपचारा करीता नेले असता डॉक्टरांनी उपचार दरम्यान मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रजत सुरेश कुर्वे, वय २३ वर्ष, रा. इंदीरा नगर कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक प्रवीण चव्हाण मो.क्र. ७०२०३५०००१ हे करीत आहेत.

२) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील धापेवाडा येथे दिनांक २९/०६/२०२२ चे १४.०० वा. सुमारास **सेवकराम नारायनराव हेडाउ(मृतक), वय ६२ वर्ष रा. धापेवाडा** यांनी त्यांचे धापेवाडा गावातील चौकात असलेल्या चहाचे टपरीवर मध्यभागी असलेला सिमेंट पोल तोडण्यासाठी मजुर सुरेश डहाट व महेश दोन्ही रा. धापेवाडा यांना मजुरीने पोल पाडण्यासाठी लावले होते. ते मजुर सेवकराम हेडाउ यांचे चहाचे टपरीचे मध्यभागी असलेला खाली पोल तोडत असतांना पोलचा अर्धा भाग तुटून सेवकराम हेडाउ यांच्या डोक्यावर पडल्याने ते गंभीर जखमी होवुन जागीच मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कुमार संकेत सेवकराम हेडाउ, वय २५ वर्ष, रा. धापेवाडा यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक राजेश हावरे मो.न ८४८३९८३९८० हे करीत आहेत.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**